



# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे





वर्ष ६ । अंक २१ । गुरुवार ८ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## बालिकाश्रम रस्त्यावरील खून प्रकरणातील दोन आरोपींना अटक



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील वर्दळीच्या बालिकाश्रम रस्त्यावर काल (दि. ७) सायंकाळी झालेल्या थरारक खून प्रकरणात तोफखाना पोलिसांनी या गुन्ह्यातील दोन प्रमुख आरोपींना अटक केली आहे. सूरज रवी सोनवणे आणि प्रेम उर्फ सोनुल्या रवी सोनवणे (दोघे रा. सिद्धार्थनगर, अहिल्यानगर) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या मागील गेटसमोरील एशियन फूड कोर्ट हॉटेलसमोर बुधवारी सायंकाळी पावणेपाच वाजेच्या सुमारास ही धक्कादायक घटना घडली. रवींद्र रामभाऊ चव्हाण (वय ५५, रा. बोल्हेगाव) हे संध्याकाळी पावणेपाचच्या सुमारास बालिकाश्रम रोड परिसरात होते. त्यावेळी अज्ञात कारणावरून दोन तरुणांनी त्यांच्या पाठीत अचानक चाकू भोसकला. या प्राणघातक हल्ल्यात चव्हाण हे गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात पडले. सिव्हीलमध्ये त्यांना मृत घोषित करण्यात आले. या प्रकरणी मृताचा मुलगा मंथन रवींद्र चव्हाण (वय २५, रा. भिंगारदिवे मळा, भुतकरवाडी, सावेडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यातप रात्री उशिरा खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्यात सुरज रवी सोनवणे आणि प्रेम उर्फ सोनुल्या रवी सोनवणे यांच्यासह इतर काही अनोळखी साथीदारांचा समावेश होता. घटनेचे गांभीर्य ओळखून तोफखाना पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली आणि यातील दोन आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. आरोपींवर भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१), ३ (५) आणि भारतीय हत्यार कायदा (आर्म्स ॲक्ट) ४, २५ अन्वये खुनाचा आणि हत्यारांचा वापर केल्याचागुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रदीप एकशिंगे हे करत आहेत.

## चतुरस्त्र अभिनेते नाना पाटेकर यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन

### गोव्यात घेतला अंतिम श्वास, मनोरंजन विश्वात हळहळ



मुंबई । वृत्तसंस्था – आपल्या दमदार अभिनयाने कोणतीही भूमिका फुलवणारा आणि तितक्याच सहज अभिनयानं थेट लोकांच्या काळजाला भिडणारा अभिनेता अशी ओळख असलेले चतुरस्त्र अभिनेते, नाना पाटेकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने गोव्यात निधन झालं. वयाच्या ७५व्या वर्षी नाना पाटेकरांनी अखेरचा श्वास घेतला.

■ पान ४ वर

**दमदार अभिनयाची पाडली छाप**

नाना पाटेकर यांचा जन्म १ जानेवारी १९५१ रोजी झाला. त्यांचं मूळ नाव विश्वनाथ पाटेकर, पण अख्ख्या सिनेसृष्टीसाठी आणि चाहत्यांसाठी ते नाना पाटेकरच होते. मराठी सिनेसृष्टीतलं दिग्गज नाव. आपल्या दमदार अभिनयाच्या जोरावर मराठी रंगभूमीपासून ते मराठी आणि हिंदी सिनेसृष्टीपर्यंत आपल्या नावाची दखल घ्यायला लावली. रंगभूमीपासून आपली कारकिर्द सुरू करणाऱ्या नानांनी नंतर सिनेसृष्टीत पदार्पण केलं आणि एकापेक्षा एक दमदार सिनेमे दिले. अगदी समांतर सिनेमांपासून, ते कॉमेडी सिनेमांपर्यंत नानांनी आपला ठसा उमटवला. त्यांनी अनेक हिंदी, मराठी सिनेमांमध्ये, नाटकांत भूमिका केल्या. नाना पाटेकरांनी नायक, सहनायक, खलनायक आणि चरित्रनायक अशा विविध भूमिका केल्या. नानांचा मराठीत नटसम्राट हा सिनेमा विशेष गाजला. अशा दिग्गज अभिनेत्याच्या एक्झीटने हळहळ व्यक्त होत आहे.

## कोयत्याच्या धाकाने दरोडा टाकणारी सराईत टोळी जेरबंद

### स्थानिक गुन्हे शाखेकडून १० गुन्हे उघड, सुमारे ७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जामखेड तालुक्यातील जवळा येथे कोयत्याचा धाक दाखवून घरावर टाकलेला दरोडा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही दिवसांत उघडकीस आणला आहे. या कारवाईत पोलिसांनी ५ आरोपींना बेड्या ठोकल्या असून, जामखेड व खर्डा पोलीस ठाण्यातील जबरी चोरी आणि घरफोडीचे तब्बल १० गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपींकडून ६ लाख ९२ हजार ५०० रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

दिनांक २ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री दोन वाजेच्या सुमारास जवळा (ता. जामखेड) येथील रहिवासी मनीषा श्रीमंत गोरे यांच्या घरावर अज्ञात दरोडेखोरांनी दरोडा टाकून कुटुंबीयांना चाकू आणि कोयत्याचा धाक दाखवत रोख रक्कम व सोन्याचे दागिने लुटून नेले. याप्रकरणी जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अनंत सालगुडे व पथकाने समांतर तपास सुरू केला. तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे पथकाने पिंपळगाव आवळा परिसरात छापा टाकून प्रदीप ऊर्फ गुड्या काळे (३०), अनिल पवार (३४), सुविकास काळे (४५), रुकऱ्या ऊर्फ लोकेश काळे (३५) आणि समाधान ऊर्फ कारभारी काळे (२१) या ५ जणांना ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. सारिका चंदन काळे हिच्या नियोजनावरून

■ पान ४ वर

## गुटखा व मावा विक्रेत्यांवर एकाच दिवशी ६ ठिकाणी छापे

### एलसीबीच्या कारवाईत अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने एकाच दिवशी धडक मोहीम राबवत गुटखा आणि मावा विक्रेत्यांवर ६ ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत तब्बल २ लाख ३९ हजार १२ रुपयांचा प्रतिबंधित गुटखा आणि सुगंधी तंबाखूचा साठा जप्त करण्यात आला आहे. कर्जत, राहाता, एमआयडीसी व श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई करण्यात आली.



स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी अवैध धंद्यांची गुप्त माहिती काढून कारवाईचे नियोजन केले. यासाठी त्यांनी पोलीस उपनिरीक्षक विकास जाधव यांच्यासह पोलीस अंमलदारांची तीन स्वतंत्र पथके तयार केली. या पथकांनी ७ ऑक्टोबर रोजी जिल्ह्यातील विविध ठिकाणी एकाच वेळी छापे मारले.

या धडक कारवाईत एकूण ६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये राहाता येथे सर्वाधिक तीन, तर कर्जत, एमआयडीसी आणि श्रीरामपूर शहर येथे प्रत्येकी एक गुन्हा नोंदवण्यात आला आहे. याप्रकरणी सोमनाथ चव्हाण (कर्जत), संभाजी धनवटे, दिनेश बनकर, राहुल गोर्डे (सर्व रा. राहाता), विशाल शिंदे (नागापूर) आणि सचिन गाडेकर (श्रीरामपूर) या आरोपींवर कायदेशीर कारवाई करत त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान अब्दुल सय्यद, शुभम माळवे,

■ पान ४ वर

## जलजीवन योजनेच्या कामांसंदर्भात चौकशी करण्याचे आदेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** जिल्ह्यात जलजीवन योजनेची काम अन्य कोणाला करण्यासाठी देणारे ठेकेदार आणि त्याला संमती देणाऱ्या ग्रामसेवकांची चौकशी करण्याचे आदेश जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्हा परिषदेच्या मूख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले.

टंचाई परीस्थीतीच्या पार्श्वभूमीवर मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीच तालुक्यातील पाणी प्रश्न चारा टंचाई वीज समस्यांचा आढावा घेण्यात आला.विविध गावातील ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीची गंभीर दखल घेवून संबंधित विभागाने कार्यवाही करण्याचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले.आ.काशिनाथ दाते अतिरिक्त जिल्हाधिकारी शैलेंद्र हिंगे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी राहूल शिंदे सुजित झावरे अशोकराव सावंत यांच्यासह सर्व विभागाचे वरिष्ठ अधिकारी शेतकरी उपस्थित होते.




बैठकीत प्रामुख्याने जल जीवन मिशन योजनांच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात आल्या.त्याची गंभीर दखल घेत मंत्री विखे पाटील म्हणाले की,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महत्वकांक्षी योजना होती.शासनाने यासाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला. दुष्काळमुक्त महाराष्ट्र करण्यासाठी मोदीची आग्रही भूमिका या योजनेतून होती.मात्र या योजना ठेकेदारांच्या झाल्या आशी खंत व्यक्त करून,ज्या ठेकेदारांनी कंत्राट घेवून काम केली नाहीत किंवा दुसऱ्या ठेकेदारांना काम कशी दिली गेली याला ग्रामसेवकांनी संमती कशी दिली याची चौकशी करण्याचे निर्देश मुख्याधिकार्यांना दिले.योजनांची काम करताना ग्रामस्थांना विश्वासात घेतले नाही.ठेकेदरांनी मनमानी पध्दतीने पाईप टाकले.सरकराचा पैसा वाया गेला.

दुष्काळी परीस्थीतीच्या पार्श्वभूमीवर गावांना टॅकर उपलब्ध करून देताना स्वच्छ व शुध्द पाणी देण्यासाठी पाण्याचा उद्धव असेल त्याठिकाणी फिल्टर बसविण्याचा राज्यातील पहीला प्रयोग आपल्या जिल्ह्यात होत असल्याचे सांगून मंत्री विखे पाटील म्हणाले की चारा टंचाई बाबत पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी नव्याने सर्व माहीती संकलित करावी. चारा उत्पादन करणारे शेतकरी पशुधन असणारे परंतू चारा नसलेल्या शेतकऱ्यांची माहीती संकलित करून यासंर्भात नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी तालुक्यातील वीजेच्या समस्यांबाबत एक दिवस सर्वाना बोलावून सर्व सयस्यांचे निराकरण करावे. छोट्याशा गोष्टीमुळे गावपातळीवरचा रोष अधिकार्यावर येतो कारण नसताना सरकारची बदनामी होते.

टंचाई परीस्थीतीच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या निधीचे प्रस्ताव तातडीने पाठवावेत.निधी अभावी काम खोळंबून ठेवू नका.सामान्य जनतेला आधार द्यायचा असल्याचे स्पष्ट करून, कुकडी कालव्याच्या कामासाठी ४४९कोटी रूपये उपलब्ध करून दिले आहेत.चार उपसा सिंचन योजनेच्या कामाचे सर्व्हेक्षण पूर्ण होत असून

■ पान ४ वर

## निघोजमधील बहुचर्चित संदीप वराळ खून खटल्यातील प्रशांत बर्डेला सर्वोच्च न्यायालयाचा नियमित जामीन मंजूर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या निघोज येथील संदीप वराळ खुन खटल्यातील फौजदारी गुन्ह्यात तब्बल नऊ वर्षांहून अधिक काळ कारागृहात असलेला प्रशांत ऊर्फ पश्या महादेव बर्डे याला सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि ३० मार्च रोजी दिलेला जामीन नाकारण्याचा आदेश रद्द करून बर्डे याला नियमित जामीन मंजूर करण्याचे आदेश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती प्रसन्न बी. वराळे यांच्या खंडपीठाने दि ५ ऑक्टोबर रोजी हा आदेश दिला.

प्रशांत बर्डे यांच्याविरुद्ध पारनेर पोलीस ठाण्यात दि . २१ जानेवारी २०१७ रोजी एफआयआर क्रमांक १९/२०१७ दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात भारतीय दंड संहिता १८६० मधील कलम ३०२, १२०(ब), १४३, १४७, १४८, १४९ व १०९ तसेच शस्त्र कायदा १९५९ मधील कलम ३/२५ व ४/२५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या गंभीर आरोपांच्या पार्श्वभूमीवर बर्डे हा २८ जानेवारी २०१७ पासून कोठडीत होते.



या प्रकरणात नियमित जामिनासाठी बर्डे याच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (फौजदारी) क्रमांक १६८३४/२०२६ दाखल करण्यात आली होती. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने यापूर्वी जामीन अर्ज फेटाळला होता. या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले.

सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीदरम्यान बर्डे हा दि २८ जानेवारी २०१७ पासून म्हणजेच नऊ वर्षांपेक्षा अधिक काळ कोठडीत असल्याची बाब विशेषत्वाने विचारात घेतली. त्याचबरोबर संबंधित खटल्याची सुनावणी अद्याप सुरू झालेली नसल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आले. या परिस्थितीचा विचार करून सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा दि ३० मार्च रोजीचा आदेश रद्द करण्याचा निर्णय घेतला.

न्यायालयाने आपल्या आदेशात अपीलकर्त्याला नियमित जामीन मंजूर केला असून, संबंधित सत्र न्यायालयाने यापूर्वी किंवा जामीन देताना घालून दिलेल्या अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहणार आहे. त्यामुळे बर्डे याच्या दीर्घकाळच्या कारावासानंतर त्याला न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे.

या सुनावणीदरम्यान अपीलकर्त्याच्या वतीने वरिष्ठ वकील सुधांशू चौधरी, वकील शरणगौडा पाटील, वकील सुप्रीता शरणगौडा, वकील गौतमी यादव तसेच एस–लीगल असोसिएट्सचे एओआर उपस्थित होते. महाराष्ट्र राज्याच्या वतीने आदित्य अनिरुद्ध पांडे, सिद्धार्थ धर्माधिकारी, श्रीरंग बी. वर्मा, सौरभ सिंग व चित्रांशा सिंग सिकरवार वकील उपस्थित होते.

सर्वोच्च न्यायालयाने ''रजा मंजूर'' असे नमूद करत स्वाक्षरी केलेल्या आदेशानुसार अपील मंजूर केले. तसेच प्रलंबित अर्ज निकाली काढण्यात आले असून, आवश्यक असल्यास अंतरिम आदेश कायम राहतील, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, या निर्णयामुळे पारनेर तालुक्यातील संबंधित फौजदारी प्रकरणाकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले असून, आता पुढील न्यायालयीन प्रक्रियेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जामीन मंजूर झाला असला तरी प्रकरणातील आरोपांबाबत अंतिम निर्णय अद्याप झालेला नसून, खटल्याची सुनावणी पुढे सुरू राहणार आहे.



## दै. आकर्षण निवडक

### नित्यसेवा ते अभियंता कॉलनी डीपी रस्त्याचे भूसंपादन करून कॉंक्रिटीकरणाचे काम मार्गी लावा



अहिल्यानगर- मनपा प्रभाग क्रमांक दोनमधील नित्यसेवा सोसायटी ते अभियंता कॉलनीपर्यंत प्रस्तावित असलेल्या १८ मीटर रुंदीच्या डी. पी. रस्त्याचे भूसंपादन तातडीने करून रस्ता कॉंक्रिटीकरणाचे काम मार्गी लावावे, अशी मागणी नगरसेवक महेश तवले यांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. सदर रस्ता पूर्ण झाल्यास परिसरातील नागरिकांना दळणवळणासाठी जवळचा मार्ग उपलब्ध होऊन वाहतूक व्यवस्था अधिक सुलभ होणार असल्याचे तवले यांनी सांगितले. अहिल्यानगर शहरातील गुलमोहर रोड पोलीस चौकी ते श्रीराम चौक, नामदेव चौकापर्यंत डी.पी. रस्ता सुरू आहे. मात्र, नित्यसेवा सोसायटी ते अभियंता कॉलनीपर्यंतच्या रस्त्याचे भूसंपादन अद्याप झालेले नसल्यामुळे या भागातील रस्त्याचे काम पुढे नेता येत नाही. त्यामुळे महापालिकेने संबंधित रस्त्याचे भूसंपादन पूर्ण करून कॉंक्रिटीकरणाचे काम तातडीने हाती घ्यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

नगरसेवक महेश तवले यांनी निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग क्रमांक दोनमधील नित्यसेवा ते अभियंता कॉलनी या दरम्यान प्रस्तावित असलेला १८ मीटर रुंदीचा डी.पी. रोड हा परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. सदर रस्त्याचे भूसंपादनाचे काम मागील अनेक दिवसांपासून प्रलंबित असल्याने परिसरातील नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर परिसरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुलभ होऊन नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. तसेच नागरिकांना दळणवळणासाठी जवळचा मार्ग उपलब्ध होणार असल्याने वेळेची व प्रवासाची बचत होण्यास मदत होईल, असे तवले यांनी नमूद केले.

### दिवाळीच्या सुटीनंतर 'पॅट' परीक्षा -सुनील गाडगे

अहिल्यानगर - राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच अनुदानित शाळांमधील इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणारी संकलित मूल्यमापन चाचणी-१ (पॅट परीक्षा) यंदा दिवाळीच्या सुटीनंतर घेण्यात येणार आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी नियतकालिक मूल्यमापन चाचण्यांच्या आयोजनास मंजुरी दिली असून, संकलित मूल्यमापन चाचणी-१ नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात, तर संकलित मूल्यमापन चाचणी-२ एप्रिल २०२७ मध्ये घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. विद्यार्थ्यांनी अपेक्षित अध्ययन निष्पत्ती कितपत साध्य केली आहे, याची पडताळणी करणे, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक सुलभ व परिणामकारक करणे तसेच अध्ययनात मागे असलेल्या विद्यार्थ्यांसाठी आवश्यक कृती कार्यक्रम तयार करून त्याची अंमलबजावणी करणे, हा नियतकालिक मूल्यमापन चाचण्यांचा प्रमुख उद्देश आहे. त्यानुसार पहिल्या सत्राच्या अखेरीस संकलित मूल्यमापन चाचणी-१ आणि दुसऱ्या सत्राच्या अखेरीस संकलित मूल्यमापन चाचणी-२ घेण्यात येतात. यंदा शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर एससीईआरटीकडून घेण्यात येणारी पायाभूत चाचणीही अद्याप घेण्यात आलेली नाही. तसेच दिवाळीपूर्वी होणाऱ्या संकलित मूल्यमापन चाचणी-१ बाबतही बराच काळ कोणत्याही स्पष्ट सूचना देण्यात न आल्याने शिक्षक व शाळा प्रशासनामध्ये संभ्रमाचे वातावरण होते. याबाबत संबंधितांकडून पत्रव्यवहारही करण्यात आला होता. अखेर एससीईआरटीच्या सहसंचालक डॉ. कमलादेवी आवटे यांनी परिपत्रकाद्वारे चाचणीच्या आयोजनाबाबत स्पष्ट सूचना दिल्या आहेत. अशी माहिती शिक्षक नेते तथा शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनील गाडगे यांनी सांगितले. संकलित मूल्यमापन चाचणी-१ एकूण दहा माध्यमांमध्ये घेण्यात येणार आहे. प्रथम भाषा, गणित आणि तृतीय भाषा (इंग्रजी) या विषयांच्या चाचण्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून विद्यार्थिनिहाय शाळांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. शाळेच्या वेळापत्रकानुसार सकाळच्या किंवा दुपारच्या सत्रात ही परीक्षा घेता येणार असून, लेखी परीक्षेनंतर तोंडी परीक्षाही घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या चाचणीचा विद्यार्थ्यांवर कोणताही अतिरिक्त मानसिक अथवा शैक्षणिक ताण येणार नाही, याची दक्षता घेण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, संकलित मूल्यमापन चाचणी-१ ही दिवाळीपूर्वीच होणे अपेक्षित होते. सत्राच्या नियोजनानुसार परीक्षा वेळेत घेणे आवश्यक असताना त्याबाबत विलंब झाल्याने शाळास्तरावर संभ्रम निर्माण झाला होता.

# यशस्वी जीवनासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा हवीच -पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन

## अशोकभाऊ फिरोदिया यांच्या जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल तर प्रयत्नांची पराकाष्ठा हवीच. विद्यार्थ्यांनी मोठे ध्येय डोळ्यासमोर ठेवावे आणि ते पूर्ण करण्यासाठी अहोरात्र मेहनत करावी. तसेच या यशाकडे जाताना ज्यांनी आपली साथ दिली, त्या आई-वडिलांना आणि गुरुजनांना कधीही विसरू नये, असे भावनिक विचार जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी व्यक्त केले.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे माजी प्रमुख कार्यवाह स्व. अशोकभाऊ फिरोदिया यांच्या जयंतीनिमित्त संस्थेतील सर्व शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन बोलत होते. यावेळी संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी, विश्वस्त मंडळाच्या सदस्या सुनंदाताई भालेराव, अॅड. गौरव मिरीकर, सल्लागार मंडळाचे सदस्या आशाताई फिरोदिया, भूषण भंडारी, मीनाताई बोरा, शैलेश मुनोत, हेमंत मुथा, पुष्पाताई फिरोदिया, शाळा समिती सदस्य संजय सपकाळ, रवींद्र बाकलीवाल, जालिंदर बोरुडे, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे प्राचार्य कैलास साबळे, अशोकभाऊ फिरोदिया हायस्कूलचे प्राचार्य प्रभाकर भाबड, रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूलचे प्राचार्य रवींद्र भांड यांच्यासह संस्थेच्या सर्व शाळांचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक प्रतिनिधी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया या वयातही मानसिक व शारीरिक दृष्ट्या सक्षमपणे संस्थेची सर्व जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत आहे. त्याबद्दल पोलिस अधीक्षकांनी त्यांचे कौतुक केले. तसेच रहदारीचे नियम, कायदा व सुव्यवस्था याबद्दल फक्त पोलिसांची भूमिका नसून विद्यार्थ्यांची देखील भूमिका तेवढीच महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना याबद्दल जागृत करणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या संस्थेत जवळपास १८ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या पालकांना याबद्दल जागृत केले तर अहिल्यानगर हे कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत निश्चितच अव्वलस्थानी असेल. विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या मायाजालापासून व व्यसनांपासून दूर राहिले पाहिजे, असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला.

प्रास्तविक संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी केले. स्व. अशोकभाऊ फिरोदिया यांनी त्यांच्या कार्यकाळात विविध उपक्रम राबवून संस्थेच्या शाळांना प्रगतीपथावर नेले. शैक्षणिक, कला, क्रीडा धोरणांना चालना दिली. त्यांच्या ध्येयधोरणाने संस्था यशस्वी शैक्षणिक वाटचाल करत आहे. शैक्षणिक गुणवत्तेसह कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात विद्यार्थी आघाडीवर असल्याचे छायाताई फिरोदिया यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांनी संगीत शिक्षक परशुराम मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली ईशस्तवन सादर केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व पाहुण्यांचा परिचय प्राचार्य कैलास साबळे यांनी करून दिला. अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शाळांमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. प्राचार्य प्रभाकर भाबड यांनी आभार मानले. सूत्रसंचलन वैभव वाघ, स्नेहल झांबरे यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## वाढदिवसाचा आनंद अंध-दिव्यांग बांधवांसोबत

### प्रथमेश आव्हाड यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीमती अश्विनी आव्हाड यांचा सामाजिक उपक्रम



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** वाढदिवसाचा आनंद केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता तो गरजू व दिव्यांग बांधवांसोबत साजरा करण्याच्या उद्देशाने श्रीमती अश्विनी आव्हाड यांनी आपला मुलगा प्रथमेश आव्हाड यांच्या वाढदिवसानिमित्त अंध व दिव्यांग बांधवांना मिठाईचे वाटप केले. यावेळी अंधोजन मंडळाचे संभाजी भोर व उपस्थित मान्यवरांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडला.

यावेळी श्रीमती अश्विनी आव्हाड म्हणाल्या, ''वाढदिवस हा प्रत्येकाच्या आयुष्यातील आनंदाचा दिवस असतो. हा आनंद गरजू आणि अंध-दिव्यांग बांधवांसोबत वाटून घेतल्याने या दिवसाचे समाधान अधिक वाढते. समाजातील गरजू घटकांसाठी आपल्या परीने काहीतरी करण्याची भावना प्रत्येकाने जपली पाहिजे.''

अंधोजन मंडळाचे संभाजी भोर म्हणाले, ''अंध व दिव्यांग बांधवांसोबत वाढदिवसाचा आनंद साजरा करून श्रीमती अश्विनी आव्हाड यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे. अशा उपक्रमांमुळे दिव्यांग बांधवांना आधार आणि आपुलकीची भावना मिळते. समाजातील प्रत्येक घटकाने अशा प्रकारे संवेदनशीलता जपत गरजूंच्या आनंदात सहभागी व्हावे.''

सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून अंध व दिव्यांग बांधवांसोबत आनंदाचे क्षण साजरे करण्यात आले. मिठाईचे वाटप होताच लाभार्थींच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. समाजातील गरजू घटकांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन त्यांच्यासोबत आनंद वाटून घेण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## वाळकीत भटके-विमुक्त समाजातील विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्रांचे वाटप

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने वाळकी (ता. नगर) येथील तिरमल वस्ती येथे भटके-विमुक्त समाजातील विद्यार्थ्यांसाठी जात प्रमाणपत्र वाटप मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. संघटनेने मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यात पात्र विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे भटके-विमुक्त राज्यप्रमुख रविकांत राठोड यांच्या हस्ते लाभार्थी विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. जात प्रमाणपत्रामुळे भटके-विमुक्त समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवेश, शिष्यवृत्ती, विविध शासकीय योजना तसेच शासनाच्या आरक्षणाच्या सुविधांचा लाभ घेण्यास मदत होणार आहे. त्यामुळे या उपक्रमाचे लाभार्थी विद्यार्थ्यांसह पालकांनी स्वागत केले.



यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस व्हीजेएनटीचे प्रदेश उपाध्यक्ष अंबादास धनगर, सरचिटणीस अशोक जाधव, टिशाताई माडेवार, नाशिक जिल्हाध्यक्ष अजित शिंदे, शिवसेना जिल्हाप्रमुख बाबूशेठ टायरवाले, उपजिल्हाप्रमुख आनंदराव शेळके, शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे पाटील, प्रदेशाध्यक्ष सुभाष काकडे, छावा भटके-विमुक्तचे जिल्हाप्रमुख उत्तम पवार, उपप्रदेशाध्यक्ष कल्याण राठोड, छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष योगेश वामन, श्रीधर शेलार, नगर तालुका नायब तहसीलदार अभिजीत वांढेकर, मंडळ अधिकारी भाऊसाहेब नांदुरकर, तलाठी मिसाळ, आनंद गायकवाड, बजरंग काकडे, योगेश खेंडके, सारोळे जेऊघाले, अर्चना परकाळे, वाळकीचे सरपंच शरद बोठे, शिवसेना उपतालुका प्रमुख दामोदर भालसिंग, बाबू काकडे आदी उपस्थित होते.

रविकांत राठोड म्हणाले की, भटके-विमुक्त समाजातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा आणि संविधानिक अधिकारांचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जात प्रमाणपत्राअभावी अनेक विद्यार्थी शैक्षणिक तसेच शासकीय सुविधांपासून वंचित राहतात. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांना जात प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत असून, अशा उपक्रमांच्या माध्यमातून समाजातील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले जात आहे.

### तालुकास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत

## नालंदा स्कूलच्या मुलींचा संघ प्रथम तर मुलांचा द्वितीय



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** वाळुंज येथील नालंदा स्कूलच्या बास्केटबॉल संघाने नगर तालुकास्तरीय स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले. १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळवत शाळेच्या क्रीडा परंपरेत मानाचा तुरा रोवला. कौशल्य, शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त आणि सांघिक खेळाच्या बळावर विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेचे नाव क्रीडाक्षेत्रात चमकवले आहे.

स्पर्धेत १४ व १७ वर्षांखालील मुली आणि मुलांच्या गटांत एकूण सहा शाळांनी सहभाग घेतला होता. नालंदाच्या १४ वर्षांखालील मुलींच्या संघाने प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द आणि निर्धाराने खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

खेळाडूंनी विजयापेक्षा जिद्द, चिकाटी आणि खेळाप्रती असलेले समर्पण महत्त्वाचे असल्याचे दाखवून दिले. या यशामागे खेळाडूंचे नियमित सराव, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि संघभावनेतून केलेले प्रयत्न महत्त्वाचे ठरले.

नालंदा स्कूलमध्ये सकाळी ६.३० ते ८.३० या वेळेत ८० हून अधिक विद्यार्थी मोफत क्रीडा प्रशिक्षण दिले जाते. वर्षभर चालणाऱ्या या प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक क्रीडा साहित्य, वाहतूक सुविधा आणि मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाते. बास्केटबॉलसह पाच विविध खेळांचे प्रशिक्षण दिले जात असून खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती बरोबरच शिस्त,आत्मविश्वास, समर्पण आणि सांघिक वृत्ती विकसित होत आहे. सातत्यपूर्ण सराव, कठोर परिश्रम आणि योग्य संधी मिळाल्यास विद्यार्थी निश्चितच उल्लेखनीय यश मिळवू शकतात हे नालंदा स्कूलच्या संघाने आपल्या कामगिरीतून सिद्ध केले आहे.

## सांस्कृतिक, ऐतिहासिक व धार्मिक वारसा जोपासण्यास स्पर्धेतून मिळते व्यासपीठ - अमोल खोले

### ऐसा सभासदांसाठी आयोजित गौरी-गणपती देखावा स्पर्धेचे बक्षीस वितरण उत्साहात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (ऐसा) आणि उमा स्टील, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने ऐसा सभासदांसाठी आयोजित करण्यात आलेल्या गौरी-गणपती देखावा स्पर्धेचे बक्षीस वितरण उत्साहात संपन्न झाले. या स्पर्धेत संस्थेच्या ३० सभासदांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे परीक्षण तसेच बक्षीस वितरण इन्स्टिट्यूशन ऑफ इंडियन इंटेरियर डिझाईनचे माजी अध्यक्ष अमोल खोले आणि शुभ फ्लॉवर डेकोरेटर्सचे संचालक सचिन भुतारे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना अमोल खोले म्हणाले की, गौरी-गणपती देखावा स्पर्धेच्या माध्यमातून सभासद तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या कलागुणांना वाव मिळतो. विविध देखाव्यांच्या माध्यमातून सामाजिक संदेश देण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून सभासदांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. गौरी-गणपती देखावा स्पर्धेच्या माध्यमातून आपला सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा जोपासला जातो, असे त्यांनी सांगितले.

सचिन भुतारे यांनी विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन केले. तसेच अशा प्रकारच्या देखावा स्पर्धेत कोणत्या बाबींकडे लक्ष दिले पाहिजे, याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

उमा स्टील कंपनीचे रिजनल हेड विजय दगडे म्हणाले की, उमा स्टीलच्या माध्यमातून सलग तिसऱ्या वर्षी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमामुळे शहरातील आर्किटेक्ट व इंजिनीअर्स यांच्या कलागुणांना वाव मिळून त्यांच्या विचारांना चालना मिळते. तसेच हा सण उत्साहात साजरा करण्यास प्रोत्साहन मिळून सामाजिक एकोपा जपण्याचा हेतूही साध्य होत असल्याचे त्यांनी नमूद केले.



संस्थेचे अध्यक्ष प्रदीप तांदळे म्हणाले की, संस्था दरवर्षी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून त्यातून सामाजिक संदेश देण्याचे काम करते. दरवर्षी या उपक्रमाला मिळणारा प्रतिसाद वाढत आहे. स्पर्धा पारदर्शक पद्धतीने घेण्यात येते. परीक्षक परीक्षण करताना देखाव्यासाठी टाकाऊ वस्तूंचा केलेला उपयोग, देखाव्यामागील सामाजिक संदेश तसेच स्पर्धकांनी स्वतः घेतलेली मेहनत या बाबींचा विचार करतात, असे त्यांनी सांगितले.

गौरी-गणपती देखावा स्पर्धेत अजय दगडे यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. सुयोग पवार आणि अनिकेत हळगावकर यांना द्वितीय क्रमांकाचे, तर सुरेश परदेशी आणि शिवम गोंधळे यांना तृतीय क्रमांकाचे पारितोषिक विभागून देण्यात आले.

याशिवाय सचिन क्षीरसागर, मकरंद देशपांडे, महेश मुळे, किरण टकले आणि विनोद काकडे या पाच स्पर्धकांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.स्पर्धेत शिवम चांडवले, वैभव फिरोदिया, दादा बेरड, प्रल्हाद जोशी, महेश तांदळे, रोहित साळुंके आणि सोनु साळुंके यांनीही सहभाग नोंदविला.गौरी-गणपती देखावा स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सुनिल औटी, संतोष खांडेकर, अनमोल जैन, सागर ढगे, संकेत पादीर, आदिनाथ आंबेकर, अमेय कुलकर्णी, सुनिल जाधव, गौरव मांडगे आणि विजय उजनीमठ यांनी काम पाहिले.

तसेच समिती सदस्य अभिजित देवी, शैलेश सप्रे, वैशाखी हिरे आणि सुनिल हळगावकर यांनीही स्पर्धेच्या आयोजनासाठी योगदान दिले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजय दगडे यांनी केले, तर संस्थेचे सचिव भूषण पांडव यांनी उपस्थितांचे आभार मानले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### विमानाने भव्य जगन्नाथ पुरीओडिशा तीर्थयात्रेचे आयोजन

अहिल्यानगर - चारधाम पैकी एक अत्यंत महत्त्वाचे धाम असलेल्या जगन्नाथ पुरीसह ओडिशातील प्रमुख धार्मिक व पर्यटनस्थळांच्या दर्शनासाठी २२ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत विमानाने विशेष तीर्थयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही यात्रा अहिल्यानगरपुरीअहिल्यानगर अशा मार्गाने संपन्न होणार असून भाविकांसाठी अत्यंत सोयीस्कर व नियोजनबद्ध स्वरूपात राबविण्यात येणार आहे. या यात्रेचे प्रमुख आकर्षण म्हणजे जगन्नाथ पुरी येथे विशेष दर्शनाची तसेच महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली असून भाविकांना भगवान जगन्नाथांचे शांत व सुलभ दर्शन घेता येणार आहे. भारतातील प्रमुख तीर्थक्षेत्रांपैकी एक असलेल्या जगन्नाथ पुरीसह ओडिशातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्गसंपन्न स्थळांचे दर्शन या यात्रेत घडणार आहे. यात्रेदरम्यान जगप्रसिद्ध कोणार्क सूर्य मंदिर, ओडिशाची जीवनवाहिनी मानले जाणारे चिल्का सरोवर, भुवनेश्वर येथील लिंगराज मंदिर, पवित्र चंद्रभागा बीच, श्रद्धेचे केंद्र असलेले रामचंडी मंदिर, प्राचीन स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना असलेले चौषष्ठ योगिनी मंदिर, तसेच निसर्गरम्य नंदकानंद अभयारण्य यांसह आणखी अनेक धार्मिक व प्रेक्षणीय स्थळांचे दर्शन घडविण्यात येणार आहे. ही संपूर्ण यात्रा विमान प्रवासाद्वारे असल्याने वेळेची बचत होणार असून ज्येष्ठ नागरिक, महिला व कुटुंबांसाठी ही यात्रा अत्यंत आरामदायी ठरणार आहे. अनुभवी मार्गदर्शक, नियोजित दर्शन व्यवस्था आणि सुसूत्र कार्यक्रमामुळे भाविकांना अध्यात्मिक समाधानासह अविस्मरणीय अनुभव मिळणार आहे. या पवित्र व आनंददायी यात्रेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.अधिक माहितीसाठी संपर्क : मो. ९४२२२२७९०६ अभिजीत पोळ,मो. ७८७५५०००५६ नंदकुमार पोळ यांच्याशी संपर्क साधावा.

### फस्ट इन फस्ट आउटद्वारे खऱ्या गरजवतांची शेतरस्ता प्रकरणे निकाली काढा- शरद पवळे

पाथर्डी- तालुक्यातील वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले शिवपाणंद शेतरस्त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने 'मिशन झिरो पेंडन्सी' अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन त्यांना गती देण्यासाठी फस्ट इन फस्ट आऊटचा तालुकास्तरीय कृती आराखडा तयार करण्यासाठी पाथर्डी तहसील कार्यालयावर महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे व उपाध्यक्ष नाथाभाऊ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पाथर्डी तालुका शिवपाणंद शेतरस्ते कृती समितीच्या पुढाकाराने संबंधित विभागांसोबत प्रलंबित शेरस्त्यांच्या प्रश्नांवर महाचर्चेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेतकऱ्यांनी घोषणा देत पाथर्डी तहसिल कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी तसिलदार उद्धव नाईक यांनी संबधित विभागांची तातडीची बैठक बोलावली. शरद पवळे यांनी तहसिलदारांकडे असणाऱ्या शेतरस्त्यांच्या प्रलंबित प्रकरणांची यादी मागवली यामध्ये अनेक जूनी प्रकरणे प्रलंबित होती. राज्यसरकारने शिव पाणंद चळवळीची आंदोलनाची मागणीनुसार दखल घेत राज्यात महत्वपूर्ण शासननिर्णय काढण्यात आले, परंतु प्रत्यक्ष मोजक्या सत्ताधारी लोकप्रतिनिधींच्या भागात कामे होत असुन समांतर पारदर्शक कामे होत नाही. जाणीवपूर्वक शेतकऱ्यांना अधिकारी वेठीस धरत आहे. यामुळे महाराजस्व अभियांनाचा फार्स ठरत आहे. यामुळे सरकार व शेतकरी यांची फसवणूक अधिकारी करत असुन फस्ट इन फस्ट आऊटप्रमाणे मिशन झिरो पेण्डन्सी अभियान राबवावे, नकाशावरच्या रस्त्यांना शाश्वत हद्दीखुणा घ्याव्यात, वहिवाटीच्या रस्त्यांच्या रुंदी नकाशावर घ्याव्यात, रस्त्यांच्या इतर अधिकारात नोंदी घ्याव्यात व प्रशासकीय न्यायालयीन आदेश निघालेल्या शेतरस्त्यांना प्राधान्याने मजबुती करणासाठी घ्यावे या विषयावर पाथर्डी तहसिलवर महाचर्चा संपन्न झाली. यावेळी तहसिलदारांनी तातडीच्या लोकआदात घेवून मिशन झिरो पेण्डन्सीसाठी फस्ट इन फस्ट आउट प्रमाणे कार्यवाहिचे आश्वासन दिले. तदनंतर कार्यालयात कोणी पैसे मागितले तर आमची आंदोलनाची दिशा बदलू असा इशारा महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी दिला.

## नकला वेळेत न मिळाल्यास प्रशासन जबाबदार - ॲड. लगड

। जिल्हा बँक निवडणुकीत नामनिर्देशन छाननीवरून वाद; ॲड. सुरेश लगड यांची प्रमाणित नकलांसाठी तक्रार
। निवडणूक निर्णय अधिकाऱ्याविरोधात न्यायालयीन दाद मागण्यासाठी कागदपत्रांच्या नकलांची मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सन २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक संचालक मंडळाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नामनिर्देशनपत्रांच्या छाननीवरून वाद निर्माण झाला आहे. प्राथमिक कृषी पतपुरवठा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मतदारसंघ, राहाता येथील उमेदवारीबाबत घेण्यात आलेल्या निर्णयासह महिला राखीव मतदारसंघातील नामनिर्देशनपत्र नामंजूर केल्याच्या निर्णयाविरोधात ॲड. सुरेश लगड यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा बँकेचे मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी मंगेश सुरवसे यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी वैध नामनिर्देशनपत्रांची यादी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून प्रसिद्ध करण्यात आली आहे. राहाता येथील प्राथमिक कृषी पतपुरवठा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मतदारसंघातून सुजय राधाकृष्ण विखे यांनी दाखल केलेल्या नामनिर्देशनपत्रावर ॲड. लगड यांच्या पक्षकार एकनाथ चंद्रभान घोगरे यांनी ६ ऑक्टोबर २०२६ रोजी हरकत घेतली होती. मात्र, संबंधित हरकत फेटाळून सुजय विखे यांचे नामनिर्देशनपत्र वैध ठरविण्यात आले असून, त्याबाबतची यादी निवडणूक कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या निर्णयाबरोबरच महिला राखीव मतदारसंघातून ॲड. लगड यांच्या पक्षकार शैलजा अमृत धुमाळ यांनी दाखल केलेले नामनिर्देशनपत्र नामंजूर करण्यात आल्याचा आक्षेपही तक्रारीत घेण्यात आला आहे. या दोन्ही निर्णयांविरोधात योग्य त्या न्यायालयात दाद मागण्याची तयारी असल्याचे ॲड. लगड यांनी स्पष्ट केले आहे.

न्यायालयीन दाद मागण्यासाठी उपलब्ध असलेली मुदत अवघी तीन दिवसांची असल्याने संबंधित निर्णयांची तसेच छाननी प्रक्रियेशी निगडित कागदपत्रांची प्रमाणित प्रत तातडीने मिळणे आवश्यक असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे सुजय विखे यांच्या नामनिर्देशनपत्राबाबत घेण्यात आलेली हरकत, ती फेटाळण्याचा निर्णय, तसेच शैलजा धुमाळ यांचे नामनिर्देशनपत्र नामंजूर करण्यासंदर्भातील निर्णय व अन्य आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित नकलांची मागणी करण्यात आली आहे.

बुधवारी संपूर्ण दिवस निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित नसल्याने कागदपत्रांच्या प्रमाणीत नकला मिळू शकल्या नाही. अनेक लोकांना माघारी जावे लागले. याला सर्वस्वी जबाबदार निवडणूक अधिकारी मंगेश सुरवसे असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

ॲड. लगड यांनी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी दोन्ही प्रकरणांशी संबंधित नकलांसाठी अर्ज जिल्हा बँकेच्या निवडणूक कार्यालयात सादर केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. मागणी केलेली कागदपत्रे एक तासाच्या आत अर्जंट स्वरूपात उपलब्ध करून द्यावीत, अशी विनंती त्यांनी केली आहे. तसेच, प्रमाणित नकल वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे न्यायालयात दाद मागण्यास विलंब झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित प्रशासनाची राहील, असा इशाराही ॲड. लगड यांनी तक्रारीत दिला आहे.

## प्रामाणिक परिश्रम केल्यास फळ निश्चित मिळते– सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास बोज्जा

### दि अहमदनगर प्रेस अँड अलाईड ऑनर्स असो. च्या उपाध्यक्षपदी विनय गुंदेचा यांची निवड झाल्या बद्दल सन्मान



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दि अहमदनगर प्रेस अँड अलाईड ऑनर्स असोशियन अहिल्यानगर च्या उपाध्यक्षपदी उद्योजक विनय गुंदेचा यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल संवाद प्रतिष्ठान अहिल्यानगर चे सचिव श्रीनिवास बोज्जा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी संवाद प्रतिष्ठानचे नरेश कांबळे ,संजय भालेराव, आदिनाथ भोसले, संजय सायगावकर, रवींद्र काळे, रवींद्र लोखंडे, गोवर्धन जाधव,कुलकर्णी साहेब व गणेश दाणे आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना श्रीनिवास बोज्जा म्हणाले विनय गुंदेचा यांचे कार्य कौतुकास्पद असून कमी वयात त्यांनी एक यशस्वी उद्योजक म्हणून नाव लौकिक केले असून सामाजिक बांधिलकी या नात्याने त्यांनी संवाद प्रतिष्ठान च्या माध्यमातून अनेक सामाजिक कार्य निस्वार्थ पणे केलेले आहे म्हणूनच त्यांच्या कामाची व कार्याची पावती म्हणूनच त्यांची असोसिएशन च्या उपाध्यक्ष पदी बिनविरोध निवड झाली, प्रामाणिक परिश्रम केल्यास फळ निश्चित मिळते याचेच एक उदाहरण आहे.

या वेळी सत्काराला उत्तर देताना विनय गुंदेचा म्हणाले माझी उपाध्यक्ष पदी निवड झाल्याने माझी जबाबदारी वाढली असून मी असोसिएशन च्या प्रत्येक सभासदास न्याय मिळवून देण्यासाठी व असोसिएशन च्या माध्यमातून अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यात चांगले कार्य करण्याचा प्रयत्न करेल, माझा आजचा सन्मान नक्कीच माझी ऊर्जा वाढण्यास मदत होईल. या वेळी कार्यक्रमाचे स्वागत नरेश कांबळे यांनी केले तर आभार आदिनाथ भोसले यांनी मानले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय भालेराव यांनी केले या वेळी संवाद प्रतिष्ठान चे इतर सदस्य उपस्थित होते.



खरवंडी कासार येथे लोकनेते स्व. राजीव राजळे यांना स्मृती दिनानिमित्त विनम्र अभिवादन. (छायाचित्र – सतिष जगताप)

## दिवाळीपूर्वी पेन्शनसह वेतन आयोगाचे थकीत हप्ते द्या; अन्यथा १३ ऑक्टोबरपासून महापालिकेत पेन्शनर्सचे धरणे आंदोलन

### ५व्या वेतन आयोगाचा फरक आणि ६व्या वेतन आयोगाचे ८ हप्ते देण्याची मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे ५व्या वेतन आयोगाचे थकीत फरकाचे हप्ते, ६व्या वेतन आयोगाचे संपूर्ण आठ हप्ते तसेच नियमित पेन्शन दिवाळीपूर्वी देण्यात यावी, अशी मागणी कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ संलग्न अहिल्यानगर जिल्हा नगरपालिका व महानगरपालिका पेन्शनर असोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे. या मागण्यांबाबत प्रधान सचिव, महापालिका आयुक्त, महापौर व उपमहापौर यांना नोटीस देण्यात आली असून, मागण्यांवर दि. १२ ऑक्टोबरपर्यंत कार्यवाही न झाल्यास दि. १३ ऑक्टोबरपासून महापालिकेसमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

या पार्श्वभूमीवर बुधवारी (दि. ७ ऑक्टोबर) कास्ट्राईबच्या जिल्हा परिषद येथील कार्यालयात संघटनेचे अध्यक्ष एन. एम. पवळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. बैठकीत महापालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. दिवाळीचा सण तोंडावर असताना अनेक सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वेतन आयोगाची थकीत रक्कम आणि वेळेवर पेन्शन मिळत नसल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, महापालिकेतील सेवानिवृत्त ५०६ कर्मचाऱ्यांना न्यायालयीन निर्णयानुसार ५व्या वेतन आयोगाचा फरक मिळणे अपेक्षित आहे. तसेच ६व्या वेतन आयोगाचे आठ हप्ते अद्याप प्रलंबित असून, त्याची अंदाजे रक्कम ६० ते ६५ लाख रुपये आहे. ही संपूर्ण थकीत रक्कम दिवाळीपूर्वी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

महापालिकेतील कायम कर्मचाऱ्यांना ११ हजार रुपये बोनस व सानुग्रह अनुदान एकरकमी देण्याबाबत निर्णय घेतल्याबद्दल संघटनेने प्रशासनाचे आभार मानले. मात्र, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतन आयोगाच्या रकमेबाबत अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली.

## युवा फुटबॉलपटू चिरायू लोढाची राष्ट्रीय स्तरावर दमदार कामगिरी

### १४व्या वर्षी विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश; सर्वोत्कृष्ट खेळाडू पुरस्कारांची मालिकाच



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अवघ्या १४व्या वर्षी फुटबॉलच्या मैदानावर आपल्या कौशल्याची, जिद्दीची आणि सातत्यपूर्ण मेहनतीची दमदार छाप उमटविणाऱ्या चिरायू लोढाने युवा फुटबॉलमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तक्षशिला स्कूलचा विद्यार्थी असलेल्या चिरायूने आंतरशालेय, राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय स्तरावरील विविध फुटबॉल स्पर्धांमध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. कमी वयात राष्ट्रीय स्तरावर पोहोचत केलेली त्याची कामगिरी निश्चितच कौतुकास्पद आणि प्रेरणादायी ठरत आहे.

चिरायूच्या खेळातील वेग, अचूक पासिंग, चेंडूवरील नियंत्रण, मैदानावरील निर्णयक्षमता आणि गोल करण्याची क्षमता यामुळे त्याने अनेक महत्त्वाच्या सामन्यांमध्ये प्रभावी कामगिरी केली आहे. आपल्या सातत्यपूर्ण खेळाच्या जोरावर त्याने तब्बल ५ ते ६ पेक्षा अधिक सामन्यांमध्ये सर्वोत्कृष्ट खेळाडू पुरस्कार मिळविले आहेत. विशेष म्हणजे राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावरील सर्वोत्कृष्ट खेळाडू पुरस्कार तसेच एनएफसीमधील सर्वोत्कृष्ट खेळाडू हा बहुमानही त्याने पटकावला आहे. त्यामुळे चिरायूची कामगिरी केवळ शालेय किंवा स्थानिक पातळीपुरती मर्यादित न राहता राष्ट्रीय स्तरावरही लक्षवेधी ठरली आहे.

फुटबॉलसारख्या वेगवान आणि स्पर्धात्मक खेळात यश मिळविण्यासाठी केवळ नैसर्गिक गुणवत्ता पुरेशी नसते, तर त्यासाठी कठोर सराव, शिस्त, तंदुरुस्ती, मानसिक तयारी आणि सातत्य आवश्यक असते. चिरायूने या सर्व बाबींवर मेहनत घेत आपल्या खेळात सातत्याने सुधारणा केली आहे. शाळेच्या मैदानापासून सुरू झालेला त्याचा प्रवास राज्य आणि राष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचला असून, त्यातून त्याची मोठी स्वप्ने आणि त्यासाठीची तयारी अधोरेखित होते.

आता १५ वर्षांखालील मद्रास सुपर कप या आगामी आव्हानाकडे चिरायूचे लक्ष असून, या स्पर्धेतही दमदार कामगिरी करण्यासाठी तो सज्ज झाला आहे. भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याचे स्वप्न उराशी बाळगून चिरायूची फुटबॉलमधील वाटचाल सुरू आहे. त्याच्या या यशामुळे युवा खेळाडूंना निश्चितच प्रेरणा मिळत असून, योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव आणि जिद्दीच्या बळावर राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण करता येते, हे चिरायूच्या प्रवासातून स्पष्ट झाले आहे. या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.

## सेवानिवृत्ती पूर्णविराम नसून आयुष्याच्या नव्या पर्वाची सुरुवात आहे - डॉ.कमर सुरुर

### संजय भिंगारदिवे यांचा सेवापूर्ती निमित्त मखदुम सोसायटी तर्फे सन्मान




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शासकीय सेवा म्हणजे केवळ नोकरी नसते, तर ती जनतेप्रती असलेली एक महत्त्वाची जबाबदारी असते. वर्षानुवर्षे आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहून काम करणे, कार्यालयीन जबाबदाऱ्या योग्य पद्धतीने पार पाडणे आणि सहकाऱ्यांशी आपुलकीचे संबंध निर्माण करणे ही मोठी गोष्ट आहे.

संजय भिंगारदिवे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागात विभागीय भांडारपाल म्हणून आपली जबाबदारी निष्ठेने पार पाडली. त्यांच्या सेवाकाळात त्यांनी आपल्या कामाला नेहमीच प्राधान्य दिले. सहकाऱ्यांना मदत करण्याची वृत्ती आणि सर्वांशी जिव्हाळ्याने वागण्याची पद्धत यामुळे त्यांनी अनेकांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले. आज सेवापूर्ती होत असताना कार्यालयीन जबाबदाऱ्यांमधून ते मुक्त होत आहेत, मात्र त्यांनी कमावलेला स्नेह, विश्वास आणि माणुसकीचे नाते कधीही निवृत्त होणार नाही.

निवृत्ती म्हणजे आयुष्याचा शेवट नव्हे. उलट हा आयुष्याच्या एका सुंदर नव्या अध्यायाचा प्रारंभ असतो. आतापर्यंतच्या धावपळीच्या जीवनातून आता स्वतःसाठी, कुटुंबासाठी आणि आवडीनिवडींसाठी अधिक वेळ देण्याची संधी त्यांना मिळणार आहे.असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय शायरा डॉ कमर सुरूर यांनी केले. सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्यानगर येथे विभागीय भांडारपाल म्हणून ३० वर्षे उल्लेखनीय सेवा बजावलेले संजय गणपत भिंगारदिवे यांच्या सेवापूर्ती व वाढदिवसा निमित्त विशेष समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

यावेळी उपस्थित मान्यवर, अधिकारी, कर्मचारी, सहकारी व मित्रपरिवाराच्या वतीने संजय भिंगारदिवे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देत त्यांच्या प्रदीर्घ सेवाकार्याचा मखदुम सोसायटी तर्फे डॉ कमर सुरूर व आबीद खान यांनी व अनेक सामाजिक संस्था, मित्र परिवार व कार्यालयाच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला. शासकीय सेवेत कार्यरत असताना त्यांनी आपल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे आणि कर्तव्यनिष्ठेने पार पाडत सहकाऱ्यांशी आपुलकीचे संबंध जपले. त्यांच्या सेवाभावी वृत्तीचा आणि कार्यातील शिस्तीचा अनेकांनी यावेळी आवर्जून उल्लेख केला.

शासकीय सेवेत अनेक वर्षे काम करताना मिळालेला अनुभव, सहकाऱ्यांचे प्रेम आणि समाजाशी जोडलेले नाते हीच त्यांच्या पुढील आयुष्यातील मोठी शिदोरी असल्याचे मान्यवरांनी सांगितले. यावेळी संजय भिंगारदिवे यांचा पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या भावी आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, आनंद, समाधान आणि यशासाठी शुभेच्छा दिल्या. समारंभाच्या निमित्ताने सहकाऱ्यांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले होते. दीर्घकाळ एकत्र काम केलेल्या सहकाऱ्यांनी त्यांच्या कार्याच्या आठवणींना उजाळा देत मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास अधिकारी, कर्मचारी, मित्रपरिवार व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रदूषण मंडळाच्या अधिकाऱ्यांसमोरच शिवीगाळ; 'रेकॉर्डिंग करू नको, नाहीतर खतम करीन'

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** कंपनीतील पाण्याचा नमुना तपासण्यासाठी आलेल्या प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांसमोरच एका व्यक्तीने आपल्याला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप चितेगाव येथील डी. एम. यांनी केला आहे. 'मोबाईल खिशात ठेव, रेकॉर्डिंग करू नको; पोलिसांत तक्रार केली तर खतम करून टाकीन,' अशी धमकी दिल्याचे त्यांनी म्हटले आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

डी. एम. यांच्या म्हणण्यानुसार, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी कंपनीतील पाण्याचे नमुने घेण्यासाठी आले होते. पाण्याचा नमुना घेत असताना संबंधित व्यक्तीने त्यांच्याशी वाद घालत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. मोबाईलवर रेकॉर्डिंग करण्यासही विरोध करत मोबाईल खिशात ठेवण्यास सांगितले. त्यानंतर गचांडी धरून मारहाणीचा प्रयत्न केल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

'पोलिसांत केस केली तर खतम करून टाकीन,' अशी थेट धमकी देण्यात आल्याचा दावा डी. एम. यांनी केला आहे. विशेष म्हणजे, या प्रकारावेळी प्रदूषण मंडळाचे अधिकारी उपस्थित होते आणि ते या घटनेचे साक्षीदार असल्याचेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, संबंधित व्यक्तीविरुद्ध यापूर्वीही पोलिस ठाण्यात सूचना दिल्याचे डी. एम. यांनी स्पष्ट केले. मात्र, त्यानंतरही धमकी देण्याचा प्रकार घडल्याने 'पोलिस प्रशासनाकडून वेळीच दखल घेतली जाणार का?' असा प्रश्न उपस्थित होत आहे. आपल्या जीवाला धोका असल्याचे सांगत डी. एम. यांनी पोलिसांकडे संरक्षणाची मागणी केली आहे. या प्रकरणात पोलिसांकडून नेमकी काय कारवाई केली जाते, तसेच प्रदूषण मंडळाचे अधिकारी या घटनेबाबत काय भूमिका घेतात, याकडे आता लक्ष लागले आहे.



बालिकाश्रम रस्त्यावरील अतिक्रमणे मनपाच्या अतिक्रमण पथकाने आज सकाळी कारवाई करत काढून टाकण्यात आले. (छाया – राजु खरपुडे, नगर)

# शेवगावच्या सुधारित पाणीपुरवठा योजनेस तातडीने मंजुरी द्यावी : अरुण मुंढे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**शेवगाव–** शेवगाव शहरातील नागरिकांना नियमित, पुरेशा दाबाने व समन्यायी पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी नगर पाणीपुरवठा योजनेच्या सुधारित प्रस्तावास तसेच टप्पा ०१ व टप्पा ०२ मधील कामांना तातडीने मान्यता देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी शिवसेना नेते अरुण मुंढे यांनी केली आहे.

याबाबत त्यांनी काल मुंबई येथे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री मा. ना. श्री. गुलाबरावजी पाटील यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. शेवगाव शहरातील वाढती लोकसंख्या व आगामी पाणीटंचाईचा कालावधी लक्षात घेता पाणीपुरवठा योजनेतील प्रस्तावित कामे तातडीने पूर्ण होणे आवश्यक आहे. योजनेस लवकर मंजुरी मिळाल्यास कामांना गती देऊन आगामी पाणीटंचाईच्या काळात तसेच भविष्यात शहरातील नागरिकांना खात्रीशीर व समन्यायी पाणीपुरवठा उपलब्ध करून देणे शक्य होणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

टप्पा ०१ व टप्पा ०२ च्या योजनेस तात्विक व प्रशासकीय मान्यता देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांना आपल्या स्तरावर निर्देश द्यावेत, अशी मागणी मुंढे यांनी केली. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत आवश्यक कार्यवाही करून योजनेला गती देण्याची विनंतीही त्यांनी केली.

दरम्यान, या मागणीबाबत मंत्री गुलाबराव पाटील यांनी सकारात्मकता दर्शवत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याचे अरुण मुंढे यांनी सांगितले.

याप्रसंगी प्रेमभाऊ जाजू सोबत उपस्थित होते. शेवगाव शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे मुंढे यांनी स्पष्ट केले.

# नटसम्राटच्या निमित्ताने ....‘नाना’

दत्ता भट यांचे नंतर नटसम्राट नाटक थांबले होते. आता नंतर कोण? शोध सुरु होता. दरम्यान डॉ. श्रीराम लागू यांचे नाव पुढे आले. तोपर्यंत डॉक्टरांच्या वृद्ध छटा चांगल्याच स्पष्ट झालेल्या होत्या. मान देखील आता जमावाने नाही नाही म्हणायला लागली होती. जेव्हा त्यांना विचारणा झाली तेव्हा त्यांनी आपले वय आणि शारीरिक स्थिती पुढे ठेवली. परंतू अनेक दिग्गजांकडून त्यांना आग्रह झाला तेव्हा त्यांनी वेळ मागून घेतली.

नटसम्राट ची ख्याती अशी होती की, जो अभिनेता नटसम्राट चे पन्नास प्रयोग करील तो आपला देह ठेवून देत असे. कारण नाटकातील अभिनय आयुष्यालाच आव्हान देत असे. हे डॉक्टर जाणून होते. याच काळात त्यांची व्याख्यानेही जोर धरत होती. त्या वेळी आणखीही अनेक कसदार नटांनी पन्नाशी ओलांडलेली होती. परंतू नटसम्राट ची व्यक्तीरेखा त्यांस अनुकूल नाही असा रंगमंच तज्ञांचा अभिप्राय होता. अखेर सततचा आग्रह थांबवण्यासाठी डॉक्टरांनी हो ना करता एकदाचा होकार दिला. परंतू अट घातली. मी फारच पंचवीस प्रयोग करीन. अगदीच पराकोटी म्हणून तीस. यापुढे नाही.

पुन्हा एकदा नाटकाचे हक्क मिळवणे, अन्य कलाकार निवडणे सुरु होऊ तालमीही सुरू झाल्या. आणि एकदाचा नटसमम्राट मंचावर आला. डॉ. लागू यांनी नटसम्राट समर्थपणे पेलला. इतकेच नव्हे तर अगोदरच्या नटांनी ज्या उंचीवर नटसम्राटला उभे केले त्याला खाली येऊ न देता, सातव्या आठव्या प्रयोगानंतर एक पायरी आणखी उंच उभा केला.

या नटसम्राट मध्ये डॉक्टर इतके विरघळून गेले की त्यांनीच घातलेली पंचवीस तीस प्रयोगांची मर्यादा कधी ओलांडली ते कळलंच नाही. जेव्हा प्रकृतीने इषारे द्यायला सुरुवात केली तेव्हा ते लक्षात आलं. पण आता उशीर झाला होता. पन्नासावा प्रयोग पुढ्यातच होता. अखेर तोही झाला. आता प्रकृतीने संप पुकारला. ऩतर काही दिवसांनी तोही अध्याय संपला.

पुन्हा प्रयोग थांबले. प्रेक्षकाची मागणी होतीच. परंतू मुख्य मुद्दा अभिनेता कोण? या वेळीही अनेक नामांकित अभिनेते पन्नाशी ओलांडलेले होतेच. परंतू निवड जमत नव्हती. आणि नानांकडे लक्ष गेलं. सगळं जमण्यासारखं होतं. अडचण होती संवादफेकीची. मुळात नानांचा तापट स्वभाव, संवाद मोठा असेल तर अतिशय वेगाने संवाद फेकण्याची सवय आणि असंच काही. तरीही त्यांना विचारणा झालीच.

नानापुढे जेव्हा नटसम्राट चार विषय आला तेव्हा काही क्षण नाना स्तब्ध. काही वेळ अंतर्मुख होऊन विचार केल्यावर नानांनी तोंड उघडलं. उपस्थित ऐकणारे एकदम उत्सुक. परंतू नाना स्वतःला जोखून होते. स्वतःशी प्रामाणिक आणि रंगभूमीशी निष्ठावान. कारण त्यांच्या अभिनयाला तेथूनच सुरुवात झालेली. त्यानी प्रस्तावकर्त्यांना स्पष्ट सांगितले मी नाटक करणार नाही. सगळ्यांचे चेहरे उतरले. एक जण बोलू लागला, पण नाना... नानानी त्याला थांबवलं. म्हणाले रंगभूमीवरील नटसम्राट आहे त्या उंचीवर राखणं ही फार मोठी जबाबदारी आहे. मी ते करु शकणार नाही. पण.. पण तुम्ही जर नटसम्राटचा सिनेमा करु शकत असाल तर मी त्यात भूमिका करीन.

जरी नानांच्या रंगमंचावरील नटसम्राटला नकार मिळाला होता, तरी नव्या पिढीला नवा नटसम्राट मिळेपर्यंतचा मार्ग दाखवला होता. सगळे उत्साहाने कामाला लागले. परत परवानग्या, पटकथा, संवाद लेखन (कारण नाटकाचे संवाद सिनेमात वापरायचे तर चार ते साडेचार तासांचा सिनेमा झाला असता.) कलाकाराची जुळवाजुळव. अखेर एकदाचा संघावरील नटसम्राट नानामुळे पडद्यावर आला. ज्यांनी मंचावर डॉक्टर लागूंचा नटसम्राट पाहिला त्यांना सिनेमातील संवाद आणि मचावरील संवाद यात मोठी तफावत जाणवेल. परंतू ज्यांनी फक्त सिनेमा पाहिला त्याच्यासाठी नटसम्राट एक पर्वणीच.

भले नानांनी मंचावरचा नटसम्राट उभा केला नाही. परंतू अभिनय क्षेत्रातील वैविध्यपूर्ण भूमिका करणारा नाना हा नटसम्राटच.

**त्याच्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली**

ज्येष्ठ पत्रकार

सॉलोमन गायकवाड

# नानांच्या जाण्याने अडगटला कुटुंबही पोरके

## कै. सतीश अडगटला यांच्याशी असलेल्या जिव्हाळ्याच्या मैत्रीच्या आठवणींना मंदार, विराज यांनी दिला उजाळा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी समोर आल्यानंतर संपूर्ण देशभरातून शोक व्यक्त केला जात असतानाच अहिल्यानगरातील अडगटला कुटुंबावरही या निधनाने वैयक्तिक दुःखाचा आघात झाला आहे. रुपेरी पडद्यावर आपल्या अभिनयाने स्वतंत्र ठसा उमटविणारे नाना पाटेकर आणि अहिल्यानगरचे सुपुत्र, सहकार व सांस्कृतिक क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व कै. सतीश अडगटला यांच्यात अनेक दशकांपासून जिव्हाळ्याचे मैत्रीचे नाते होते. या मैत्रीच्या अनेक आठवणींना कै. सतीश अडगटला यांचे चिरंजीव मंदार आणि विराज अडगटला यांनी उजाळा दिला.

नाना पाटेकर आणि कै. सतीश अडगटला यांच्या मैत्रीचा धागा रंगभूमीशी जोडलेला होता. नाना पाटेकर आपल्या अभिनयाच्या जोरावर रंगभूमीवर स्वतःची वेगळी ओळख निर्माण करीत असताना सतीश अडगटला हे नाट्य व्यवस्थापन आणि सांस्कृतिक क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावत होते. नाटकाविषयीची आवड, रंगभूमीवरील कामाची जाण आणि कलाकारांप्रती असलेला जिव्हाळा या समान धाग्यांमुळे दोघांची जवळीक वाढत गेली. पुढे ही मैत्री केवळ रंगभूमीपुरती मर्यादित न राहता कौटुंबिक जिव्हाळ्याच्या नात्यात परिवर्तित झाली.

मंदार आणि विराज यांच्या आठवणीनुसार, नाना पाटेकर हे प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचल्यानंतरही जुन्या मित्रांना विसरले नाहीत. कै. सतीश अडगटला यांच्याशी असलेले त्यांचे नाते त्यांनी कायम जपले. अडगटला यांनी आयोजित केलेल्या सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांना नाना अनेकदा आवर्जून उपस्थित राहत. मित्राचा आग्रह किंवा शब्द याला नाना मोठे महत्त्व देत असत. त्यामुळे नाना पाटेकर यांच्या व्यक्तिमत्त्वाशी अहिल्यानगरचे नाते जोडले गेले आणि शहरातील अनेकांना त्यांचा जवळून परिचय झाला.

या मैत्रीची सर्वाधिक संस्मरणीय आठवण म्हणजे सन २००० मधील नगर शहर सहकारी बँकेच्या नवीन मुख्य शाखेच्या इमारतीचा उद्घाटन सोहळा. त्यावेळी कै. सतीश अडगटला हे नगर शहर सहकारी बँकेचे चेअरमन होते. बँकेच्या नवीन मुख्य शाखेची इमारत पूर्ण झाल्यानंतर मोठ्या उत्साहात उद्घाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या महत्त्वाच्या प्रसंगासाठी सतीश अडगटला यांनी आपले जिवलग मित्र नाना पाटेकर यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते.

नाना पाटेकर त्या काळात चित्रपटसृष्टीतील अत्यंत लोकप्रिय आणि व्यस्त अभिनेते होते. मात्र, मित्राच्या आमंत्रणाला त्यांनी मान दिला आणि ते उद्घाटन सोहळ्यासाठी अहिल्यानगरमध्ये आले. कोणताही बडेजाव न करता, मित्राच्या शब्दाला महत्त्व देत नानांनी या कार्यक्रमाला उपस्थिती लावली. त्यांच्या उपस्थितीमुळे त्या सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. बँकेचे तत्कालीन सभासद, कर्मचारी तसेच शहरातील नागरिकांच्या स्मरणात हा प्रसंग आजही ताजा असल्याचे मंदार आणि विराज यांनी सांगितले.

नाना पाटेकर यांच्या स्वभावातील साधेपणा आणि माणुसकीचा अनुभव अडगटला कुटुंबाने जवळून घेतला. मोठ्या पडद्यावर अत्यंत प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख असतानाही वैयक्तिक आयुष्यात ते अत्यंत साधेपणाने वागत. जुन्या मित्रांसाठी वेळ देणे, मित्राचा आग्रह मानणे आणि नात्यांमध्ये कोणताही दिखावा न आणणे हा त्यांच्या स्वभावाचा भाग होता. कै. सतीश अडगटला यांच्याशी असलेली त्यांची मैत्री याचेच उदाहरण असल्याची आठवण मंदार आणि विराज यांनी सांगितली.

वडिलांच्या आणि नाना पाटेकर यांच्या मैत्रीचे अनेक प्रसंग अडगटला कुटुंबीयांनी जवळून अनुभवले आहेत. नानांचा घरातील वावरही एखाद्या प्रसिद्ध अभिनेत्याप्रमाणे नव्हे, तर जवळच्या मित्राप्रमाणेच असायचा. त्यामुळे नाना पाटेकर हे अडगटला कुटुंबासाठी केवळ चित्रपटसृष्टीतील मोठे नाव नव्हते, तर कुटुंबाशी जिव्हाळ्याचे संबंध असलेले आपलेच एक व्यक्तिमत्त्व होते.

नाना पाटेकर यांच्या निधनाने एका महान अभिनेत्याला देश मुकला आहे. अभिनयाबरोबरच सामाजिक प्रश्नांबाबत संवेदनशील भूमिका घेणारे आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांशी जोडलेले व्यक्तिमत्त्व म्हणूनही त्यांनी स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या जाण्याने चित्रपटसृष्टी, रंगभूमी आणि सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. मात्र, अडगटला कुटुंबासाठी ही पोकळी आणखी वैयक्तिक आहे. कै. सतीश अडगटला यांचा जिवलग मित्र, त्यांच्या आयुष्यातील अनेक सुख-दुःखांचा साक्षीदार आणि कुटुंबाशी आपुलकीचे नाते असलेला माणूस हरपल्याची भावना मंदार आणि विराज यांनी व्यक्त केली. वडिलांच्या आणि नानांच्या मैत्रीच्या आठवणी आता आमच्यासाठी अनमोल ठेवा आहेत, असे त्यांनी सांगितले.

रंगभूमीच्या माध्यमातून सुरू झालेली ही मैत्री पुढे अनेक दशकांपर्यंत टिकली. प्रसिद्धी, पद आणि व्यस्त जीवन यापलीकडे जाऊन नात्यांची जपणूक कशी करावी, याचे उदाहरण नाना पाटेकर आणि कै. सतीश अडगटला यांच्या मैत्रीतून पाहायला मिळते. नाना पाटेकर यांच्या निधनानंतर त्यांच्या अभिनयाच्या आठवणी देशभरात जपल्या जातीलच; मात्र अहिल्यानगरातील अडगटला कुटुंबासाठी नानांची आठवण एका महान अभिनेत्यापेक्षा जिवलग मित्र म्हणून कायम मनात जिवंत राहणार आहे.

# दलित समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपा कटिबद्ध! – विश्वजीत गायकवाड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** शहरात भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चा महाराष्ट्र प्रदेश प्रमुख पदाधिकारी बैठक उत्साहात पार पडली. भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विश्वजीत गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या महत्त्वपूर्ण बैठकीत अनुसूचित जाती मोर्चाचे राज्यातील पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत पक्षाची आगामी वाटचाल, ग्रामीण भागातील जनतेचे प्रश्न आणि केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून दलित समाजासाठी राबविण्यात आलेल्या विविध जनहितकारी निर्णयांवर सविस्तर चर्चा करत आगामी उपाययोजनांचे नियोजन करण्यात आले.

लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे झालेल्या या एकदिवसीय बैठकीची सुरुवात सकाळी दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी सुधीर जांभूळकर यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना मांडली. यानंतर पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांचे व्हर्च्युअल (दूरदृश्य) प्रणालीद्वारे मार्गदर्शनपर भाषण झाले. सर्व पाहुण्यांचे स्वागत बैठकीचे आयोजक तथा भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे राज्य उपाध्यक्ष मनेष साठे यांनी केले.

सकाळच्या सत्रात नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा परिचय व संघटनात्मक विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. दुपारच्या दुसऱ्या सत्रात पक्षाच्या प्रमुख महामंत्र्यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यामध्ये महामंत्री परिमलजी कांबळे यांनी संघटनात्मक जबाबदारी आणि कर्तव्ये' यावर मार्गदर्शन केले, तर महामंत्री राहुल कांबळे यांनी चळवळ आणि पक्षीय मूल्ये यावर सखोल माहिती दिली.

# शरदचंद्रजी पवार होमियोपॅथीक मेडिकल कॉलेजचा उज्वल निकाल

## तृतीय वर्षाचा १००% तर चतुर्थ वर्षाचा ९८.८८% निकाल



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**श्रीरामपूर–** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या उन्हाळी २०२६ परीक्षेत शरदचंद्रजी पवार होमियोपॅथिक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, वडाळा महादेव (श्रीरामपूर) या महाविद्यालयाने यशाची उज्वल परंपरा कायम राखत उत्कृष्ट निकाल नोंदवला आहे.

महाविद्यालयाचा तृतीय वर्ष बी.एच.एम.एस. (२०२२) सी.बी.डी.सी. चा निकाल १०० टक्के लागला असून चतुर्थ वर्ष बी.एच.एम.एस. (२०२२) सी.बी.डी.सी. चा निकाल ९८.८८ टक्के लागला आहे. तृतीय वर्षाच्या एकूण ७७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती व सर्व ७७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तर चतुर्थ वर्षाच्या ९० विद्यार्थ्यांपैकी ८९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून केवळ ०१ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाला आहे. महाविद्यालयाने ही निकालाची उज्वल परंपरा कायम ठेवल्याची माहिती शिवा ट्रस्ट (छत्रपती संभाजी नगर) चे चेअरमन डॉ. बाळासाहेब शिवाजीराव पवार यांनी दिली.

### गुणवंत विद्यार्थी

**तृतीय वर्ष बी.एच.एम.एस.:**
**प्रथम क्रमांक: खान नमेरा नदिम (६७.७८%)**
**द्वितीय क्रमांक: जाधव श्वेता मोहन (६६.९४%)**
**तृतीय क्रमांक: देशमुख मनिषा दत्तात्रय (६६.८४%)**
**चतुर्थ वर्ष बी.एच.एम.एस.:**
**प्रथम क्रमांक: चंदन मयुरी विजय (६९.४%)**
**द्वितीय क्रमांक: अढागळे कविता बाळू (६८.२६%)**
**तृतीय क्रमांक: म्हेत्रे प्रिती बालाजी (६८.६%)**

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन डॉ. बाळासाहेब पवार, संचालक मा. श्री. दिलीपदादा पवार, प्रशासकीय अधिकारी श्री. श्रीकांत पवार, प्राचार्य डॉ. रिझवान अहमद तसेच प्राध्यापक डॉ. दर्शनी साबळे, डॉ. बी. हरिश्चंद्रे, डॉ. पागीरे संगीता, डॉ. अभय पानसंबळ, डॉ. आगळे अनिता, डॉ. जाधव भगीरथ, डॉ. दहे विद्या, डॉ. जेठलिया विपिन, डॉ. पौर्णिमा कळमकर, डॉ. पवार विजय, डॉ. रियाज पटेल, डॉ. जावळे देवेंद्र, डॉ. रेखा नाईक, डॉ. सोनवणे प्रतिमा, डॉ. कळमकर प्रदीप, डॉ. टेंभूर्णे विशाखा, डॉ. महेजबीन शेख, डॉ. सूरज थोरात, डॉ. शेख मुनज्जा, डॉ. समर रणसिंग, डॉ. दीप्ती गाडेकर, डॉ. आंबेकर प्राची, डॉ. गायकवाड बाळकृष्ण, डॉ. कोकाटे महेश, डॉ. मेमन मोहम्मद नाकीब कदम, डॉ. हीना जातु, डॉ. सेलवन सेन्थिल, डॉ. शिंगवी मीनाक्षी, डॉ. पवार श्वेता, डॉ. लता सगळेगिळे, डॉ. अमोल म्हस्के, डॉ. मिसबा खान व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

(पान १ वरून)

### चतुरस्त्र अभिनेते नाना पाटेकर यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन

मराठी इंडस्ट्रीसोबत बॉलिवूडही गाजवणाऱ्या नानांच्या अकाली एग्झिटनं मनोरंजनसृष्टीला धक्का बसला आहे. गोव्यातील डोना पावलामधील घरी नाना पाटेकरांना मध्यरात्री हृदयविकाराचा झटका आला होता, त्यानंतर त्यांना मणिपाल रूग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र उपचारादरम्यान नाना पाटेकरांचं निधन झाले.. नाना पाटेकर यांच्या पार्थिवावर आज सायंकाळी त्यांचे घर असलेल्या पुण्याजवळील डोणजे गावात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. अभिनेते नाना पाटेकर यांचे मराठी नाटकासह मराठी, हिंदी सिनेमातील अतुलनीय योगदान पहाता त्यांचे अंत्यसंस्कार शासकीय इतमामातकरण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने घेतल्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी जाहीर केले.

### कोयत्याच्या धाकाने दरोडा टाकणारी सराईत टोळी जेरबंद

हा दरोडा टाकल्याचे समोर आले. तसेच आरोपी समाधान काळे याने राजुरी, डोळेवाडी, आरणगाव, धामणगाव, चौंडी आदी भागांत घरफोड्या केल्याचे उघड झाले. पोलिसांनी आरोपींनी सोने ठेवलेल्या इसमांकडून अंगठी, मंगळसूत्र, बोरमाळ, गंठण व कर्णफुले असा एकूण ६ लाख ९२ हजार ५०० रुपयांचा ऐवज जप्त केला. या गुन्ह्यातील इतर चार फरार आरोपींचा शोध सुरू असून, पुढील तपास जामखेड पोलीस करत आहेत

### गुटखा व मावा विक्रेत्यांवर एकाच दिवशी ६ ठिकाणी छापे

बंटी भाकरे आणि अकरम हे आरोपी पसार झाले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

सदरची यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, उपनिरीक्षक विकास जाधव आणि त्यांच्या पथकातील अंमलदार अभिजीत अरकल, बिरप्पा करमल, रोहित मिसाळ, प्रकाश मांडगे आदींनी केली आहे.

### जलजीवन योजनेच्या कामांसंदर्भात चौकशी करण्याचे आदेश

यासाठी निधी कमी पडणार नाही.पुणेवाडी राळेगण व अन्य योजनाचा आराखडा तयार झाला असून पारनेर दुष्काळमुक्त करण्याचे खासदार साहेबांनी पाहीलेले स्वप्न पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले. आ.काशिनाथ दाते यांनी दुष्काळी परीस्थीतीच्या पार्श्वभूमीवर समस्या उपस्थित करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम सरकारच्या माध्यमातून सूरू होत असल्याचे त्यांनी सांगितले.